  

## आपल्याला माहिती आहे का?

- एखाद्या स्त्रीच्या संमतीविना केलेली कोणतीही लैंगिक कृती बलात्कार ठरतो.
- लैंगिक छळाची तक्रार नोंदवून घेण्यात हयगय केल्यास संबंधित अधिकाऱ्यांना तुरूंगवास देण्यात येईल!!
- पाठलाग करणे, अश्लील हावभाव करणे आणि शाब्दिक लैंगिक टोमणे यांच्यावर देखील तुरूंगवासाची शिक्षा होऊ शकते!!!





## हे यामुळे शक्य झाले आहे

- स्त्रियांची सुरक्षितता आणि प्रतिष्ठा ही अनिवार्य तत्वं असल्याचा काँग्रेस पक्षाचा ठाम विश्वास.
- देशात होत असलेल्या लैंगिक अत्याचारांबाबत काँग्रेस पक्षाला चिंता वाटते आहे.
- स्त्रियांना सक्षम करण्यासाठी काँग्रेस पक्षाची वचनबद्धता.

CONGRESS

*"स्त्रिया आणि मुलांवर होणाऱ्या अत्याचारांना कारणीभूत निर्लज्ज सामाजिक मनोवस्थेला आपण सहन करू शकणार नाही. स्त्रियांच्या संपूर्ण सक्षमीकरणासाठी काँग्रेस पक्ष सदैव आघाडीवर राहिला आहे. आपण ही मोहीम जारी ठेवणार आहोत. आपल्या देशातील प्रत्येक स्त्री आणि मुलीला सुरक्षित वाटण्याचा, प्रत्येक बाबतीत संपूर्ण समानता मिळण्याचा मूलभूत घटनात्मक अधिकार आहे."*

*- श्रीमती सोनिया गांधी*







## फौजदारी कायदा (सुधारणा) कायदा, 2013

- **एखाद्या स्त्रीच्या संमतीविना केलेले कोणतेही लैंगिक कृत्य आता कायद्याने बलात्कार मानण्यात येईल.**
- **कोणताही लैंगिक गुन्हा नोंदविण्यास नकार देणाऱ्या कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याला दोन वर्षांचा तुरूंगवास आणि दंडही करण्यात येईल.**
- **लैंगिक हल्ल्यांतील पीडितांवर उपचार करण्यास नकार देणाया कोणत्याही रूग्णालय कर्मचाऱ्याला एक वर्ष तुरूंगवास आणि दंडाची शिक्षा देण्यात येईल.**
- **लैंगिक गुन्हेगारांसाठी कडक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.**

### त्यात समाविष्ट आहे :

1. **ॲसीड हल्ला :** पाच ते दहा वर्षे (आणि पीडितेला भरपाई म्हणून रु. दहा लाख दंडापोटी).
2. **बलात्कार :** दंडासह किमान सात वर्षे (जन्मठेपेपर्यंत).
3. **सामूहिक बलात्कार :** दहा वर्षे तुरूंगवास (किंवा जन्मठेप).
4. **अधिकारी व्यक्तिद्वारे बलात्कार :** पाच ते 10 वर्षे तुरूंगवास (किंवा जन्मठेप).
5. **घटस्फोटित पत्नीवर बलात्कार :** दोन ते सात वर्षे तुरूंगवास.
6. **बलात्कारितेचा मृत्यु :** किमान 20 वर्षे तुरूंगवास (किंवा जन्मठेप किंवा मृत्युदंड).
7. पाठलाग करणे/स्त्रीचे वस्त्रहरण, अश्लील हावभाव आणि कोणत्याही प्रकारचा लैंगिक छळ यासाठी देखील तुरूंगवास दिला जाईल.
8. शाब्दिक लैंगिक हल्ल्यांवर देखील एक ते पाच वर्षे तुरूंगवासाची शिक्षा होऊ शकते.

*स्त्री देह-व्यापार, त्यांच्या कामाची पिळवणूक, किंवा त्यांच्या अवयवांचा साठा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तिला सात ते 10 वर्षे तुरूंगवास दिला जाईल.*

CONGRESS

Marathi